CMYK

बीड । मंगळवार

१३.०५.२०२५

वर्षे : ५ अंक : ४२

किंमत : ३ रु. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 




## मराठवाड्यात अवकाळीने शेतकऱ्यांचे नुकसान

## वीज पडून जनावरे दगावली, अंब्याचे नुकसान, लाईटच्या तारा तुटल्या







**बीड । प्रतिनिधी**

मराठवाड्यासह बीड जिल्ह्यात अनेक ठिकाणी गारासह सोमवारी दुपारी झालेल्या वादळी, अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. वादळी पावसाने आंब्याचे व वीज कोसळून पाच ठिकाणी जनावरे दगावली. अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली, घराची पत्रे उडाली, वीज पडून जनावरे दगावली, तर वीजेचे पोल पडल्याने अनेक भागांमध्ये रात्री उशिरापर्यंत विद्युत पुरवठा खंडीत झाला होता. या वादळी पावसाने मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे नुकसान झाले . दोन तीन दिवस आणखी वादळी वाऱ्याची पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.

अनेक भागांमध्ये रस्त्यावर पाणी साचले, गटारीतील पाणीरस्त्यावर आल्याने रस्त्याला नद्याचे स्वरूप प्राप्त झाले होते. शिवाजी धांडे नगर, सोमेश्वर मंदिरते मुक्ता लॉन्सपर्यंतचा रस्ता अनेक भागामध्ये पाणी साचून तळ्याचे स्वरूप आले होते.

**सोमवारी पडलेल्या अवकाळी पावसाने बार्शी रोडवर असलेल्या धांडे नगर पासून शिवपार्क कॉलनी पर्यंत नाल्याचे कामाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी उद्‌घाटन केलेल्या कामाचे अर्धवट काम राहिल्याने रोडला तळ्याचे स्वरूप आले आहे.नाला मोठा असल्याने जिवीत हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. एखादा जीव गेल्यावर हा नाला होणार का असा संतप्त सवाल नागरिकन मधून व्यक्त केला जात आहे.**

## रस्त्याला आले तळ्याचे स्वरूप,गटाराचे पाणी रस्त्यावर




बीड जिल्ह्यातील नागरिक उकाड्याने हैराण झाले होते,गतवर्षीपेक्षा यावर्षी तापमानाचा पारा वाढल्याचे दिसत होते.पहिल्याच पावसाने जोरदार एन्ट्री केली. दुपारी अचानक वादळ वारा विजेच्या कडकडाटासह पावसाची सुरुवात झाल्याने नागरिकांची तारांबळ उडाली. शहरातील जालना रोडवरील तसेच काझी नगर मधील नाली, गटारांचे पाणी रस्त्यावर वाहू लागले.त्यामुळे नगरपालिकेचा विकास उघडा पडल्याचे बोलले जात आहे.

तसेच बार्शी रोडवरील धांडे नगर कमानी मध्ये पाणी साचले होते.त्यामुळे या भागातील नागरिकांना पाण्यातून मार्ग काढावा लागत होता. दुचाकी, चारचाकी पाण्यातून जात होत्या परंतु पायी चालण्यासाठी मात्र मार्ग सापडत नव्हता.अशीच परिस्थिती बार्शी रोडवर देखील पहावयास मिळाली या रस्त्याच्या दोन्ही बाजूस नाल्या नसल्याने पावसाचे पाणी रस्त्यावरच साचले होते. त्यामुळे रस्त्यावर वाहतूक कोंडी झाली होती तसेच रस्त्यावरच पाणी साचल्याने अपघाताच होण्याची शक्यता नाकारता येत नाही. रस्त्यावर पाणी च पाणी झाल्याने सोमेश्वर मंदिर ते मुक्ता लॉन्स,जगताप कॉम्प्लेक्स मुख्य रस्त्याला तळ्याचे स्वरूप आले. रस्त्याच्या दोन्ही बाजूस नाल्या. जालना रोड लगत नाल्या ओसंडून वाहत असल्याने नाल्याची घाण दुर्गंधयुक्त पाणी रस्त्यावर आले होते, जालना रोडवरील महावितरण कार्यालयाच्या बाजूला गॅरेज मध्ये दुरुस्तीसाठी आलेल्या दुचाकी या पाण्यात अडकून पडल्या होत्या. एक तासाच्या पावसाने शहराची दयनीय अवस्था पहावयास मिळाली. मोठा गाजा वाजा करत नगरपालिकेने बीड शहर स्वच्छ शहर असा दाखवण्याचा प्रयत्न केला होता परंतु मान्सून पूर्व पहिल्याच पावसात बीडचा विकास उघडा पडल्याचे नागरिकांतून संताप व्यक्त होत आहे. त्यामुळे नगरपालिकेने मान्सून पूर्व कामे न केल्याने शहराची ही अवस्था झाली असून आता तरी नगरपालिका मुख्याधिकारी, प्रशासक यांना जाग येईल का? असा प्रश्न बीड शहरवासी यांना पडला आहे.बार्शी रोडवर रस्त्याच्या दोन्हीं बाजूस नाला करून द्यावी अशी मागणी होत आहे.

## बीडमध्ये ईडीची धडक कारवाई: 188 कोटींची मालमत्ता जप्त, कुटे ग्रुपच्या गैरव्यवहारांचा पर्दाफाश




**बीड । प्रतिनिधी**

ज्ञानराधा मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या २,४६७ कोटी रुपयांच्या गुंतवणूक फसवणूक प्रकरणात सक्तवसुली संचालनालय (एऊ) ने मोठी कारवाई करत कुटे ग्रुपशी संबंधित तब्बल १८८ कोटी ४१ लाख रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे. या कारवाईमुळे बीडमधील कुटे ग्रुपचे साम्राज्य हादरले असून त्यांच्या अनेक कंपन्यांच्या मालमत्तांवर टाच आणण्यात आली आहे. ईडीने दिलेल्या माहितीनुसार, जप्त केलेल्या मालमत्तांमध्ये जमीन, इमारती, औद्योगिक प्लांट आणि विविध यंत्रसामग्रीचा समावेश आहे. सर्व मालमत्ता बीड जिल्ह्यात असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. या प्रकरणात ईडीने आतापर्यंत १६२१ कोटी ८९ लाख रुपयांपेक्षा अधिक मालमत्ता जप्त केली असून तपास अजून सुरू आहे. ईडीच्या प्राथमिक तपासात स्पष्ट ▶▶ उर्वरित पान २ वर

## वादळी-वारा, पावसाने झालेल्या नुकसानीची आ.संदीप क्षीरसागरांकडून पाहणी

### ● तातडीने पंचनामे करण्याचे प्रशासनाला निर्देश



**बीड । प्रतिनिधी**

वादळी-वारा व अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीची आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. तसेच झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाला दिले आहेत. सोमवारी (दि.१२) रोजी बीड मतदारसंघातील बीड शहर आणि ग्रामीण भागात अचानक वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस झाला. या पावसामुळे नागरिकांचे आणि शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या अनुषंगाने बीड विधानसभा मतदारसंघाचे ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● विद्युत व्यवस्था सुरळीत करण्याच्या सूचना

**अचानकपणे जोरदार वादळी वारे सुटल्याने विद्युत वितरणाची व्यवस्था विस्कळीत झाली. अनेक ठिकाणी विद्युत तारा तुटल्या तसेच विद्युत खांब पडले आहेत. त्यामुळे वीज पुरवठा खंडित झाला आहे. बीड शहर आणि ग्रामीण भागात तात्काळ वीजपुरवठा सुरळीत करण्याच्या सूचनाही आ.संदीप क्षीरसागर यांनी विद्युत विभागाला दिल्या आहेत.**

## कौटुंबिक कार्यक्रम आटोपून परतताना भीषण अपघात, दोन वाहनांची जोरदार धडक, १३ जणांचा मृत्यू, अनेकजण जखमी

**वृत्तसंस्था**

दोन वाहनांमध्ये झालेल्या भीषण धडकेत १३ जणांचा मत्यू झाल्याची घटना घडलीय. यात एका सहा महिन्यांच्या बाळाचाही समावेश आहे. अनेकजण जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे वत्त आहे. छत्तीसगडच्या रायपूरमध्ये ट्रकला ट्रेलरने धडक दिल्याने हा अपघात झाला आहे. या अपघातामुळे परिसरात प्रचंड गोंधळाचे वातावरण असून मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. रविवारी रात्री उशीरा हा अपघात झाला. रायपूर जिल्ह्यातील रायपूर बालोदाबाजार ▶▶ उर्वरित पान २ वर



## अजित पवार दौऱ्यावर असताना नांदेडमध्ये गोळीबार, एक जण ठार

**नांदेड । प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री नांदेड जिल्ह्यात असताना आज दुपारी १२ वाजता वसरणी येथील जलशुद्धीकरण केंद्राजवळ झालेल्या गोळीबारात एक जण ठार तर एक गंभीर जखमी झाला आहे.


राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना दुपारी १२ वाजेच्या सुमारास वसरणी येथे जलशुद्धीकरण पेंद्राजवळ किरकोळ वादातून गोळीबार झाला. आशू पाटील ऊर्फ कमलेश लिंबापुरे आणि शेख परवेज व तेजासिंग बावरी यांच्यात वाद झाला. या वादाचे पर्यवसान भांडणात झाले. आशू पाटील ऊर्फ कमलेश याने स्वतःच्या बंदुकीतून शेख परवेज व तेजासिंग ▶▶ उर्वरित पान २ वर



## बीडमध्ये गुन्हेगारांच्या चार टोळ्यांवर मकोका; 9 पोलिसांचे निलंबन, 2 अधिकाऱ्यांसह चौघे बडतर्फ

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील गुंडगिरी मोडीत काढण्याचे काम सध्या वेगाने सुरू आहे. याअंतर्गत वाल्मीक कराडसह चार टोळ्यांवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मकोका) कारवाई करण्यात आली आहे. दरम्यान, मागील पाच महिन्यांत ११ पोलिसांना निलंबित केले आहे. त्यातील दोघांचे निलंबन दोन महिन्यांतच मागे घेण्यात आले आहे,




तर दोन पोलीस अधिकाऱ्यांसह चौघांना बीडच्या पोलीस दलातून बडतर्फ करण्यात आले आहे. बीड पोलीस अधीक्षक कार्यालयातून ही माहिती प्रसिद्ध करण्यात आली आहे. बीड पोलीस अधीक्षकांकडून सुरू असलेल्या या कारवाईमध्ये परळीतील फड टोळीवर रविवारी मकोका कायद्यान्तर्गत कारवाई करण्यात आली आहे. रघुनाथ फड व इतर ७ ते ८ जणांनी १८ ऑक्टोबर २०२३ रोजी सहदेव वाल्मीक सातभाई यांना अडवून मारहाण सव्वादोन लाख रुपये लुटले होते. याप्रकरणी रघुनाथ रामराव फडसह जगन्नाथ विक्रम फड, ▶▶ उर्वरित पान २ वर




CMYK

# आज दुपारी एक वाजता जाहीर होणार दहावी बोर्डाचा निकाल!

दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी सर्वात मोठी बातमी समोर आली आहे. दहावी बोर्डाचा निकाल आज लागणार आहे. उद्या मंगळवारी दुपारी 1 वाजता दहावी परीक्षेचा निकाल ऑनलाईन जाहीर केला जाणार आहे. निकाल जाहीर झाल्यानंतर विद्यार्थी त्यांच्या मार्कशीट्स अधिकृत वेबसाइट mahresult.nic.in द्वारे तपासू आणि डाउनलोड करू शकतात. दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी सर्वात मोठी बातमी समोर आली आहे. दहावी बोर्डाचा निकाल उद्या लागणार आहे. आज मंगळवारी दुपारी 1 वाजता दहावी परीक्षेचा निकाल ऑनलाईन जाहीर केला जाणार आहे. निकाल जाहीर झाल्यानंतर विद्यार्थी त्यांच्या मार्कशीट्स अधिकृत वेबसाइट mahresult.nic.in द्वारे तपासू आणि डाउनलोड करू शकतात. गेल्या आठवड्यात बारावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर दहावीच्या निकालाकडे विद्यार्थी आणि पालकांचे लक्ष लागले होते. या निकालाची पालक आणि विद्यार्थी आतुरतेने वाट पाहत आहेत. अखेर मंगळवारी 13 मे रोजी महाराष्ट्र बोर्डाकडून दहावी परीक्षांचा निकाल जाहीर केला जाणार आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची अधिकृत वेबसाईट mahahsscboard.in, mahresult.nic.in वर विद्यार्थी आपला निकाल पाहू शकतील.



● या वेबसाइटवर पाहता येईल निकाल (SSC Result 2025 )

1. http://www.mahresult.nic.in
2. http://sscresult.mkcl.org
3. https://ssc.mahresults.org.in

● दहावी परीक्षा 2025 चा निकाल ऑनलाइन असा तपासा (How to check maharashtra 10th result)

अधिकृत वेबसाइटवर mahahsscboard.in, mahresult.nic.in ला भेट द्या
मुख्यपृष्ठावर महाराष्ट्र SSC निकाल 2025 तपासण्यासाठी थेट लिंकवर क्लिक करा.
समोर दिलेल्या जागेत आवश्यक लॉगिन तपशील भरा.
महाराष्ट्र बोर्ड एसएससी निकाल 2025 स्क्रीनवर दिसेल.
सर्व तपशील तपासून घ्या आणि निकाल डाउनलोड करा

● निकाल SMS द्वारे तपासण्याची प्रक्रिया

तुमच्या स्मार्टफोनमधील मेसेजिंग ॲप उघडा.
मेसेजमध्ये MHSSC <स्पेस> तुमचा सीट क्रमांक टाइप करा. (उदा: MHSSC S123456)
मेसेजमध्ये MHHSC <स्पेस> तुमचा सीट क्रमांक टाइप करा. (उदा: MHHSC H789012)
तयार केलेला मेसेज 57766 या क्रमांकावर पाठवा.
काही क्षणांत तुम्हाला तुमच्या निकालाची माहिती SMS द्वारे प्राप्त होईल.

● विद्यार्थ्यांसाठी निकाल पाहण्याच्या टिप्स

निकाल तपासण्यापूर्वी तुमचा सीट क्रमांक आणि इतर तपशील तयार ठेवा.
निकाल जाहीर झाल्यावर वेबसाइटवर गर्दी होऊ शकते, त्यामुळे वेळ लागू शकतो.
अशा परिस्थितीत SMS सेवा हा जलद पर्याय आहे, तुम्ही एसएमएस करून निकाल पाहू शकता.
निकाल मिळाल्यानंतर तुमच्या गुणपत्रिकेची डिजिटल प्रत डाउनलोड करून ठेवा.

## MPSC च्या परीक्षेत वैष्णवी राज्यात मुलींमध्ये प्रथम, कोचिंग न लावता मिळवले असे यश






महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात आलेल्या अभियांत्रिकी सेवा परीक्षा २०२३ चा निकाल जाहीर झाला. त्यात स्थापत्य अभियांत्रिकी सेवा परीक्षेत सोलापुरातील वैष्णवी राम गायकवाड हिने मुलींमध्ये राज्यात पहिला क्रमांक पटकावला आहे. वैष्णवीचे प्राथमिक शिक्षण नु.म.वि. शाळेत तर माध्यमिक शिक्षण दमाणी विद्या मंदिर येथे झाले आहे. पुढे तिने अभियांत्रिकी शिक्षणासाठी ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश घेतला. महाविद्यालयात अव्वल क्रमांक पटकावला होता. अभियांत्रिकीच्या प्रथम वर्षी ती बाटू विद्यापीठात प्रथम आली होती. वैष्णवी ही मराठा सेवा संघाचे राम गायकवाड यांची कन्या आहे.

नियमित आठ ते दहा तास अभ्यास– वैष्णवी हिने सिव्हील इंजिनिअरींगची पदवी घेतली. त्यानंतर सरकारी सेवेत जाण्यासाठी स्पर्धा परीक्षेच्या क्षेत्रात उतरण्याचा निर्णय घेतला. वैष्णवी हिने सांगितले की, सुरुवातीला पुण्यात जाऊन अभ्यास सुरु केला. दीड ते दोन वर्ष पुण्यात अभ्यास केला. परंतु एकही क्लास मला चांगला वाटला नाही. त्यामुळे स्वत:च अभ्यास केला. त्यानंतर पहिल्यांदा परीक्षा दिली. परंतु त्यात यश आले नाही. त्यानंतर सोलापूरमध्ये येऊन घरीच अभ्यास सुरु केला. जिद्द चिकाटी आणि सातत्याच्या बळावर तिने हे यश संपादन केल्याचे वैष्णवी हिने सांगितले. कोणतेही कोचिंग क्लास न लावता तिने एमपीएससीचा अभ्यास केला. रोज आठ ते दहा तास अभ्यास करीत होती. त्या माध्यमातून यशापर्यंत पोहचली. स्पर्धा परीक्षेत यश मिळवण्यासाठी दोन ते पाच वर्षांचा कालावधी लागतो. त्यामुळे त्यापद्धतीने नियोजन करुन आणि कुटुंबाशी संवाद साधून या क्षेत्रात उतरण्याचा निर्णय घ्यावा, असै वैष्णवी गायकवाड हिने सांगितले.

पान १ वरून पुढे...

## बीडमध्ये ईडीची....

झाले आहे की, सुरेश कुटे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ज्ञानराधा मल्टिस्टेट सोसायटीच्या माध्यमातून गुंतवणूकदारांची फसवणूक केली. विविध आकर्षक योजनांच्या आडून सुमारे ४ लाख गुंतवणूकदारांकडून हजारो कोटींच्या ठेवी स्वीकारल्या गेल्या आणि त्या रकमा 'द कुटे ग्रुप'च्या कंपन्यांकडे कर्जाच्या स्वरूपात वळवण्यात आल्या.

गेल्या वर्षी मे ते जुलै महिन्यांदरम्यान या प्रकरणी सुरेश कुटे यांच्यासह इतर आरोपींविरुद्ध नऊ फसवणुकीचे गुन्हे दाखल करण्यात आले होते. महाराष्ट्र ठेवीदारांचे हितसुरक्षा कायदा आणि फसवणुकीसंदर्भातील विविध कलमांखाली ही गुन्हे नोंदविण्यात आली आहेत.

फसवणुकीचा मास्टरप्लान आणि ईडीची कारवाई– ईडीने तपासादरम्यान स्पष्ट केले की सुरेश कुटे आणि त्यांच्या पत्नीच्या मालकीच्या कंपन्यांना अवैधरित्या मोठ्या प्रमाणात निधी वळवण्यात आला. हा निधी कायदेशीरपणे गुंतवणूकदारांना परत दिला जाणे अपेक्षित होते. परंतु, तो अन्यत्र वळवून स्वतःच्या फायद्यासाठी वापरण्यात आला.

या घोटाळ्यातील गुंतवणूकदारांची संख्या आणि रकमेची व्याप्ती पाहता, हे महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या आर्थिक फसवणूक प्रकरणांपैकी एक मानले जात आहे. ईडीने यापूर्वी तीन वेळा मालमत्तांवर टाच आणली होती आणि आता चौथ्यांदा आणखी कारवाई करत १८८ कोटींच्या मालमत्तांवर कब्जा केला आहे.

गुंतवणूकदारांनी अशा योजनांपासून सावध राहणे गरजेचे आहे. एखादी योजना अतिशय फायदेशीर वाटत असल्यास, त्यामागील पारदर्शकतेची खात्री करणे आवश्यक आहे. आर्थिक व्यवहारात जाणीवपूर्वक शहाणपणाने निर्णय घेणं हाच चांगल्या गुंतवणुकीचा मूलमंत्र आहे.

## वादळी-वारा, ...

आमदार संदीप क्षीरसागर यांनी विविध नुकसानग्रस्त ठिकाणी तात्काळ जाऊन पाहणी केली. झालेल्या अवकाळी पाऊस आणि वादळी वार्यामुळे शेतीचे तसेच नागरिकांच्या घरांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानींचे तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्तांना शासनस्तरावरून मदत करण्यासाठी कार्यवाही करण्यासाठी प्रशासनाला आ.क्षीरसागर यांनी निर्देश दिले आहेत.

## कौटुंबिक कार्यक्रम...

रस्त्यावर सारागावजवळ रविवारी रात्री उशीरा झालेल्या या अपघातात चार मुले व ९ महिलांचा समावेश आहे. अपघाताची माहिती मिळताच पोलीस पथक घटनास्थळी पाठवण्यात आले व जखमींना रायपूरच्या डॉ भीमराव आंबेडकर रुग्णालयात तातडीने नेण्यात आले. या अपघातात साधारण १३ जण जखमी झाले आहेत. पोलिसांनी अपघातानंतर पंचनामा करत मतृदेह ताब्यात घेतले असून याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाची चौकशी सुरु आहे.पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, चतौड गावातील एका कौटुंबिक कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी बन्सरी गावात गेलेलं कुटुंब परत येत असताना खरोरा हद्दीत सारागावजवळ ट्रकने प्रवास करत असताना एका ट्रेलरने मागून धडक दिली.

या अपघातानंतर महामार्गावर बराच वेळ वाहतूक कोंडी झाली होती. चौथिया छठी कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी गावातील लोक माझदा वाहनाने खरोरा येथील बना बनारसी येथे गेले होते. कार्यक्रम संपल्यानंतर सर्वजण परतत होते. दरम्यान, रायपूर–बालोदाबाजार रोडवर हा अपघात झाला. अपघातानंतर प्रशासनाचे पथक घटनास्थळी पोहोचले आणि जखमींना उपचारासाठी रायपूर येथे पाठवण्यात आले. प्रशासनाच्या पथकाने क्रेनच्या मदतीने गाडीतील मृतदेह बाहेर काढले असून जखमींवर उपचार सुरु आहेत.अधिकाऱ्यांनी अपघाताची औपचारिक चौकशी सुरू केली आहे. प्राथमिक निष्कर्षांवरून असे दिसून येते की जास्त वेग आणि चालकाच्या निष्काळजीपणामुळे हा अपघात झाला असावा.या दुःखद घटनेने पुन्हा एकदा रस्ते सुरक्षा कायद्यांची कडक अंमलबजावणी आणि रात्रीच्या वेळी महामार्गावरील वाहतुकीचे चांगले नियमन करण्याची तातडीची गरज अधोरेखित केली आहे.

## अजित पवार...

बावरी यांच्यावर गोळ्या झाडल्या. यात शेख परवेज (२५) हा जागीच ठार झाला तर तेजासिंग बावरी हा गंभीर जखमी झाला. त्याला खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेचे वृत्त समजताच पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व त्यांचे सहकारी घटनास्थळी पोहोचले. त्या ठिकाणी आढळलेली रिकामी काडतुसे जप्त करण्यात आली आणि घटनेचा पंचनामा करण्यात आला. गोळीबार करणारा आशू पाटील ऊर्फ कमलेश फरार झाला असून, त्याच्या शोधात तीन पथके तैनात करण्यात आली आहेत...

## बीडमध्ये गुन्हेगारांच्या...

सुदीप रावसाहेब सोनवणे, बालाजी अंकुश दहिफळे (सर्व रा. परळी) व विलास बालाजी गिते (रा. नंदागौळ, ता. परळी) यांना अटक करण्यात आली आहे. धनराज ऊर्फ राजेभाऊ फड व ग्यानदेव ऊर्फ गोट्या गिते हे दोघे पसार आहेत. या टोळीने परळी व अंबाजोगाई परिसरात दहशत माजवली असून, दोन्ही हद्दीत १० गुन्हे केल्याचे उघडकीस आले. यातील ९ गुन्ह्यांची दखल न्यायालयाने घेतली. या टोळीवर मकोका लावण्याचा प्रस्ताव ४ मे रोजी विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र यांच्याकडे पाठवला होता. त्यानुसार मकोका लावण्यास परवानगी दिल्याचे बीडच्या पोलीस विभागाकडून प्रसिद्ध करण्यात आले आहे. यापूर्वी वाल्मीक कराड व त्याच्या टोळीवर मकोका अंतर्गत कारवाई केली आहे. खोक्या ऊर्फ सतीश भोसलेवरही मकोकाची कारवाई केली आहे. अन्य एका टोळीवरही मकोका लावण्यात आला आहे. या शिवाय बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक म्हणून पदभार स्वीकारल्यापासून नवनीत कॉवत यांनी मागील पाच महिन्यांत ११ पोलीस कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई केली होती. यामध्ये खोक्याला कारागृहाच्या आवारात विशेष सेवा–सवलत दिल्याचा ठपका ठेवत विनोद सुरवसे व कैलास खटाणे या पोलीस कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली होती. मात्र, नुकतेच या दोन कर्मचाऱ्यांचे निलंबन मागे घेतले. तर पोलीस निरीक्षक सुनील नागरगोजे व उपनिरीक्षक रणजित कासले यांना छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र यांनी बडतर्फ केली आहे. दोन शिपायांना पोलीस अधीक्षकांनी बडतर्फ केले.

पान ४ वरून पुढे...

## वारकरी शिक्षण...

राम महाराज डोंगर,ग गाथकंठस्थ दत्ता महाराज येवले,सत्यवान महाराज लाटे विष्णूपंत महाराज लोंढे.गणेश महाराज जोगदंड ,महंत विलास महाराज भोसले गुरुजी ,बाळनाथ महाराज गिरी चाकरवाडी अतुल महाराज येवले,विष्णुदासजी महाराज सुरवसे ,डॉ राजेंद्र वीर, आदर्श शेतकरी दिलीप बाजगुडे,आदर्श शेतकरी दत्ता जाधव यांच्यासह हजारो भाविक भक्तांची उपस्थिती होती. बीडच्या श्रीक्षेत्र नेकनूर येथे वारकरी संप्रदायातील महान संत बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवात सहाव्या दिवसाचे कीर्तन पुष्प महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार श्री ह भ प उल्हास महाराज सूर्यवंशी यांचे संपन्न झाले. यावेळी त्यांनी संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या..

न गमे हा संसारु ह्मणोनि केला भ्रतारु ।
लोक अनाचारु म्हणती मज ।।१।।.
चंचळ जालिये म्हणतील मज । कवणा सांगूं जिवीचें गूज ।।२।।
बापरखुमादेविवरा विठ्ठलावांचुनि नेणें ।
सतत राहणें याचे पायीं ।।३।।

स्वअनुभवपर अभंगावर सुंदर चिंतन मांडले हा अबुला प्रकरणातील अभंग आहे.. संत बंकट स्वामी महाराज यांचे अस्तिव आजही आहे. स्वामीचे जीवन गुरुनिष्ट होते.ते अवतारकोटीतील महापुरुष व अजाणबाहु होते. साधनेचा आदर्श स्वामी महाराजा कडे पाहिले की खरा परमार्थ कळतो..घोरड्या डोंगरावर बंकटस्वामी महाराज यांनी एकांतात साधना करून गाथा ज्ञानेश्वरी भागवत पाठ केले.झोप येऊ नये म्हणून दगडात खिळा ठोकून स्वतःची शेंडी बांधली. खडतर साधना केली. वारकरी सांप्रदायातील चौरंगी चिरा.. बंकटस्वामी महाराज...बाल गंधर्व काकडा ऐकायला यायचे.स्वामीची वाणी रसाळ होती. वाणीत गोडवा होता, वाणी पिकलेली होती.भक्ती ज्ञान वैराग्य आणि साधना स्वामी महाराजांकडे होत्या.. ओजस्वी परंपरेचे तेजस्वी रत्न स्वामी महाराज होते. अस महाराज म्हणाले.. यावेळी साथ संगत महाराष्ट्रातील शेकडो विद्यार्थी घडवणारे पखवाज पंडित केशव जगदाळे गुरुजी.दिग्विजय केशव जगदाळे संगीत अलंकार देविदास महाराज जाधव झुका गुरुजी ,संगीत विशारद देविदास महाराज बर्डे.. यांच्यासह बंकटस्वामी फडावरील सर्व टाळकरी मंडळी उपस्थित होती..

## खुनाचा प्रयत्न...

त्यांनी न्यायालयाचे लक्ष आरोपीच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीकडे वेधले आणि जामीन नाकारण्याची विनंती केली. सरकारी वकील ॲड. ए. डी. राख यांनीही त्यांच्या भूमिकेचे समर्थन केले. सुनावणीदरम्यान, सरकारी वकिलांनी न्यायालयाला सांगितले की, आरोपीविरुद्ध वैजापूर न्यायालयात खुनाचा (कलम ३०२) खटला प्रलंबित आहे, ज्यामध्ये तो जामिनावर आहे. याव्यतिरिक्त, संभाजीनगर (औरंगाबाद) येथील न्यायालयात त्याच्याविरुद्ध आणखी दोन फौजदारी खटले प्रलंबित आहेत. या पार्श्वभूमीवर आणि रेकॉर्डवरील गुन्हेगारी साहित्याचा विचार करून न्यायालयाने प्रथमदर्शनी आरोपी गंभीर गुन्हा करण्याचा प्रयत्न करत असल्याचे मत नोंदवले. आरोपीने यापूर्वी जामिनाच्या अटींचा गैरवापर केल्याचे दिसून येते. त्यामुळे, आरोपीला जामीन मंजूर केल्यास तो पुन्हा अशाच प्रकारचा शारीरिक गुन्हा करू शकतो, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. प्रमुख सत्र न्यायाधीश यांनी आरोपीचा जामीन अर्ज फेटाळण्याचा आदेश दिला. तसेच, गंगापूर आणि वैजापूर येथील पोलीस स्टेशनच्या तपास अधिकाऱ्यांना याबाबत कळवण्याचे निर्देश दिले आहेत. या निर्णयामुळे पीडितेला काहीसा दिलासा मिळाला आहे. सदरील प्रकरणात ड.अक्षय मुळे यांना ड.अभिजीत कदम, ड हर्षल बहिर,ड यशवंत जगताप,ड. प्रविण खाडेंनी सहकार्य केले.

## मोठेवाडी ग्रामपंचायतीच्या...

अशोक रासवे, शाम गिरी, आकाश रासवे, दत्तात्रय तपसे, राहुल सुरवसे,जालिंदर खेत्री,भगवान रोकडे, ॲड. पांडुरंग गोंडे, चक्रधर हिवरकर,गजानन गोंडे, संतोष खेत्री व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सरपंच पदी निवड जाहीर झाल्या नंतर गावकऱ्यांनी त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. आपल्यावर दाखविलेल्या विश्वासाला कधीही तडा जाऊ न देता गावच्या विकासासाठी सदैव प्रयत्न करेन अशी प्रतिक्रिया यावेळी नवनिर्वाचित सरपंच सुभद्रा अंगरराव खेत्री यांनी दिली आहे.

## बाळराजे दादा ...

मताधिक्याने दोनदा आमदार केले आण्णांनी प्रमाणीक पनाने जनतेची सेवा केली बाळराजे दादा पवार यांच्या नेतृत्वाखाली गेवराई तालुक्याचा सर्वांगीण विकास केला गेल्या दोन दशकांनंतर गेवराईचा बाळराजे राजा दादा कायमचा मुक्त झाला असून आता जनतेमध्ये दाखल झाला आहे गेवराई मध्ये बाळराजे दादा पवार यांनी पाऊल टाकताच तालुक्यातील नागरिकांची रीग पवार कुटुंबाच्या घराकडे लागली असून बाळराजे दादा यांना भेटण्यासाठी बोलण्यासाठी फोटो काढण्यासाठी नागरिक उत्सुक आहेत गेवराईकर बाळराजे दादा पवार यांच्या राजकीय भूमिका कडे लक्ष वेधून आहे गेवराई मध्ये पवार कुटुंबाचा दरारा कायम चालेला आहे असा विश्वास नागरिक व्यक्त करत आहेत.

## संगीतमय शिव...

यांच्या मधुर वाणीतून ही कथा सात दिवस सुरू राहणारा आहे. कथा ही मंगळवारी सुरू होणार असून सकाळी सात ते आठ या वेळे मध्ये रुद्र अभिषेक आठ ते अकरा पारायण गाथा भजन दुपारी २ ते ५ या वेळेत संगीतमय शिव महापुराण कथा ५ ते ६ यावेळेत शिवपाठ होईल तसेच शिवपुराण कथेत येणाऱ्या भाविकांना रुद्राक्ष व बिल्वपत्र मोफत दिले जाईल.मंगळवारी समाप्ती होईल त्या निमित्त ह.भ.प.उमाशंकर महाराज मिटकरी यांचे शिव कीर्तन होईल त्या नंतर महाप्रसाद होईल. ह्या कथेचे आयोजन स्वामी विवेकानंद मा.शाळा केज येथे करण्यात आले असून केज तसेच पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी प्रसिद्ध शिवकथाकार रूपाली ताई घोंगडे यांच्या कथेचा लाभ घ्यावा असे आव्हान चंद्रकांत किसन सत्वधर यांनी केले आहे.

## विश्वाला भगवान...

प्रविण शिंदे, नागेश शिंदे, सनी शिंदे, बाळासाहेब शिंदे, राहुल शिंदे, किरण शिंदे, माणिक शिंदे, सखाराम शिंदे, राज शिंदे, रोहित शिंदे यांच्यासह ढेकनमोह ग्रामस्थांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

## घोसापुरीतील कामे...

असलेले घोसापुरी हे गाव. पिण्याच्या पाण्यापासून ते रस्ते, नाली, पथदिवे अशा अनेक अडचणींचा ग्रामस्थांना सामना करावा लागत होता. गावातील विविध कार्यामध्ये सक्रिय सहभाग असलेल्या शेख फारुक यांची धावपळ पाहून त्यांच्याच गळ्यात बिनविरोध सरपंचपदाची माळ टाकण्यात आली. अवघ्या काही महिन्यात शेख फारुक यांनी घोसापुरीचा चेहरामोहरा बदलून टाकला. जलजीवन योजना, रस्ते, नाल्या, अंगणवाडी ही कामे अत्यंत दर्जेदार केली. तसेच ग्रामपंचायत भवनासह इतर कामे प्रगतीपथावर आहेत. ११ मे रोजी जिल्हा परिषदचे मुख्यकार्यकारी अधिकारी आदित्य जीवणे यांनी घोसापुरी येथे भेट दिली. यावेळी त्यांनी पंतप्रधान आवास योजना, मोदी आवास योजना व रमाई आवास योजनामधील लाभार्थ्यांच्या घरकुलाचा आढावा घेतला. या भेटी दरम्यान घोसापुरी येथील नवीन अंगणवाडी इमारतचे उद्घाटन जीवने यांच्या हस्ते करण्यात आले. अंगणवाडीचे उत्कृष्ट बांधकाम पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. तसेच यादरम्यान त्यांनी गावांमध्ये नवीन घरकुलांचे भूमिपूजन केले. गावामधील चालू व पूर्ण झालेल्या घरकुलाच्या कामांना भेटी दिल्या व इतर घरकुलांची कामे गतीने पूर्ण करून दिवाळी नवीन घरात करण्याबाबत सूचना दिल्या. प्रधानमंत्री आवास योजनामधील लाभार्थ्यांचे नरेगा मस्टर कटाक्षाने तात्काळ काढून त्यांचे मस्टर पेमेंट बद्दल लाभार्थ्यांना माहिती दिली. तात्काळ शंभर टक्के मस्टर मागणी देण्याबाबत सूचना देण्यात आल्या. या भेटी दरम्यानच त्यांनी गावातील इतर भौतिक सुविधांची पाहणी करून त्याबाबत समाधान व्यक्त केले. याप्रसंगी घोसापुरीचे उमदे नेतृत्व शेख फारुक, ग्रामपंचायत अधिकारी रवींद्र हावळे, प्रभारी सरपंच सुभाष जाधव, ग्रामपंचायत सदस्य कल्याण बांड, अजय माळी, लक्ष्मण कदम, शेख आवेज, सुरेश वैद्य, विकास वाघमारे, शालेय समितीचे अध्यक्ष राजाभाऊ माळी, श्रीमंत वैद्य, आजिनाथ पोकळे, भारत कानडे, शेरु भाई व गावातील इतर प्रतिष्ठित नागरिक, घरकुल लाभार्थी, अंगणवाडी सेविका, ग्रामरोजगारसेवक आणि पंचायत समिती बीड येथील घरकुल विभागातील विस्तार अधिकारी चांगण, अमोल चव्हाण, घरकुल इंजिनियर देवडकर, प्रभारी अधिकारी नागरगोजे, उमेदच्या गोस्वामी यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

## बंकटस्वामी संस्थानने...

वेगळा आदर्श घालून दिला आहे. हे रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी नेकनूरमधील सर्व गणेश मंडळाचे कार्यकर्ते त्याचबरोबर बचत गटाच्या महिला, अन्नदान कमिटी व वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. रक्तदात्यांना फळ बिस्किट्स आणि पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

## तिन सहकारी...

युवा नेते ईश्वर तांबडे, डॉ. अंगद तांबडे, शेख मेहबूब सर, हनुमंत मात्रे, प्रताप मात्रे, अंगद मात्रे, अरुण कोठुळे, विष्णू कोठुळे, नवनाथ तांबडे, शिवाजी मुंडे, डॉक्टर दुटळ साहेब, बालासाहेब बडे, सुरेश दोडताले, शिवाजी दोडताले ,बालू तुरे लक्ष्मण मात्रे ,गोवर्धन कुटुळे, शहादेव मात्रे ,अंगद बडे, अशोक मात्रे, वाघा मात्रे, कृष्णा नखाते ,सुखदेव कुटुळे, विष्णू कुटुळे ,पांडुरंग मात्रे ,विक्रम कुटुळे, शिवाजी कोठुळे, शेख साहिल, अरुण कुटुळे ,लिंबा मात्रे, देवानंद तांबडे ,अखिल कोठुळे, संदीप नानवर, पुरुषोत्तम आबा तांबडे, अमोल पोळ , इंदू बडे ,नाजम शेख ,तात्या कुटुळे, सुग्रीव मात्रे, बाबुराव तावरे ,सखाराम बडे असे अनेक मान्यवर स्वागत कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# जगाला बुद्धांच्या तत्वज्ञानाची गरज; पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांचे प्रतिपादन

## शिवणीत थायलंडच्या बुद्ध मूर्तीची झाली प्रतिष्ठापणा ; बीड शहरातुन निघाली बुद्ध प्रतिमेची धम्म रॅली

**बीड । प्रतिनिधी**

अवघे जग बौद्ध धम्माकडे वैज्ञानिक दृष्टिकोणातुन पाहते. त्यामुळे मानवी जीवन जगत असतात तथागत गौतम बुद्धाने दिलेले तत्वज्ञान अंगिकारले पाहिजे.असे मनोगत पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी व्यक्त केले.

बीड तालुक्यातील शिवणी येथील महाविहार धम्मभूमी डॉ.भदन्त आनंद कौसल्यायन नगर, येथे सोमवार (दि.१२) मे रोजी तथागत गौतम बुद्ध यांच्या २५६९ व्या जयंती निमित्ताने बुद्ध मूर्ती प्रतिष्ठापणा व अनावरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी उपस्थित बौद्ध जनसमुदयास संबोधित करताना नवनीत काँवत बोलत होते. यावेळी प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था,बीड तथा बुद्ध जयंती महोत्सवाचे मुख्य संयोजक भिक्खु धम्मशिल थेरो, कार्यक्रमाचे उदघाटक डॉ.भिक्खु उपगुप्त महाथेरो तर अध्यक्ष म्हणून डॉ.भिक्खु इंदवंस्स महाथेरो, प्रमुख उपस्थितीत भिक्खु चंद्रमुणी होते.प्रमुख धम्मदेसना भिक्खु महाकाश्यप थेरो, भिक्खु पय्यावर्धन तर प्रमुख पाहुणे म्हणून सीईओ आदित्य जीवने, नायब तहसीलदार



सुहास हजारे, अधीक्षक अभियंता व्ही.एल.कांबळे, संपादक कुणाल कांबळे, इंजि बी. के. अदमाने उपस्थित होते. पुढे बोलतांना नवनीत काँवत म्हणाले की, बुद्धाने या जगाला प्रज्ञा,शील, करुणा शिकविली. चक्रवर्ती सम्राट अशोक राजाने बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचा जगात प्रचार आणि प्रसार केला. शिल्प आणि शिलालेखाच्या माध्यमातून बुद्धाचे तत्त्वज्ञान या जगात कायम जिवंत आहे आणि जिवंत राहील. भारत हा बुद्धाची जन्मभूमी आहे म्हणून आपल्या देशाची जगात ओळख आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपुर येथे बौद्ध धम्म दीक्षा देऊन बुद्धांचे तत्त्वज्ञान पुन्हा आपल्याला अवगत करून दिले आहे. आज शिवनी येथे तथागत सिद्धार्थ गौतम बुद्ध यांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना होत आहे. येणाऱ्या काळात या पुण्यभूमीतून तथागताच्या तत्त्वज्ञानाचा प्रसार आणि प्रचार होईल असे मनोगत पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. प्रदीप रोडे यांनी केले तर सूत्रसंचालन दीपक भालेराव यांनी केले. यावेळी प्रा.डॉ. मनोहर सिरसाट यांच्या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र ग्रंथाचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. बुद्ध महोत्सवाला बीड जिल्ह्यासह राज्यभरातून बौद्ध उपासक-उपासिका, आंबेडकरी जनता मोठ्या संख्येने उपस्थित होती.

### ● धम्म रॅलीने वेधले लक्ष

**तथागत सिद्धार्थ गौतम बुद्ध यांच्या जयंती निमित्ताने बीड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा इथपर्यंत तथागत सिद्धार्थ गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेची भव्य धम्म रॅली काढण्यात आली. या धम्म रॅलीत बौद्ध भिक्खू, बौद्ध उपासक उपासिका, आंबेडकरी जनता पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून सहभागी झाली होती. त्यामुळे या रॅलीन बीड शहराचे लक्ष वेधून घेतले होते.**

### ● बीड जिल्ह्यात सर्वात मोठी थायलंड येथील बुद्धमूर्ती!

**बीड तालुक्यातील शिवणी येथील महाविहार धम्मभूमी डॉ.भदन्त आनंद कौसल्यायन नगर, येथे बीड जिल्ह्यातील सर्वात मोठी बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापणा करण्यात आली आहे. सदरील मूर्ती थायलंड या देशातून आणण्यात आली आहे. बुद्ध महोत्सवाचे संयोजक पूज्य भिक्खु धम्मशिल थेरो यांच्या धम्म चळवळीतून ही मूर्ती बसविण्यात आलेली आहे.**



*बीड : शहरातील पोलीस मुख्यालयात राहणारे पोलीसांचे कुटुंबच असुरक्षित; पोलिसांना देण्यात आलेली पोलीस मुख्यालयाची इमारत धोकादायक; पहिल्याच पावसात नव्याने झालेल्या इमारतीतील भ्रष्टाचार उघड. तात्काळ संबंधित ठेकेदारावर कारवाई करण्याची गरज.*

# कृषी क्षेत्रात आदित्य शिक्षण संस्थेचे नाव विद्यार्थ्यांनी अटकेपार नेले

## आदित्य कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या निरोप प्रसंगी डॉ. आदिती सारडा यांचे प्रतिपादन

**बीड । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या यशावर संस्था नावारूपाला येत असते. आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य कृषी महाविद्यालयातील विद्यार्थी आज शासकीय, खासगी क्षेत्रात मोठ-मोठ्या पदावर कार्यरत आहेत. महाविद्यालयात त्यांनी घेतलेली मेहनत आणि येथील प्राध्यापकांच्या योग्य मार्गदर्शनामुळे आज आदित्य कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी अटकेपार झेंडा रोवला असल्याने आम्हाला विद्यार्थ्यांचा सार्थ अभिमान आहे. आपणही



कृषी क्षेत्रात चांगले योगदान देऊन शेतकऱ्यांसाठी, देशासाठी मोठे कार्य कराल असे प्रतिपादन वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी केले. आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली आदित्य कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभाचा कार्यक्रम अयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. व्ही. बी. शिंदे यांनी केले. त्यांनी मुलांना भविष्यात कशाप्रकारे पुढे जायचे आहे. याबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रिया गव्हाणे यांनी तर आभार प्रा. डॉ. पी. डी. खेडकर यांनी मानले. यावेळी प्रा. प्रिया गव्हाणे, प्रा.ध्यापक व्ही .बी. शिंदे, प्रा.डॉ. पी.डी. खेडकर, प्रा. व्ही. एस. मिसाळ, प्रा.डॉ. एन.यु. ठोके, प्रा.डॉ. डी. बी. सातपुते यांची उपस्थिती होती.

### ● शेती आणि मातीशी नाळ जोडा- प्राचार्य डॉ. कल्याण आपेट

**कृषी क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी पदवी घेतली. या पदवीचा उपयोग आपल्या ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी करा. शेती आणि मातीशी नाळ जोडा. आपल्या नवनविन तंत्रज्ञानाचा शेतकऱ्यांना कसा फायदा होइल. कमी क्षेत्रात, कमी कष्टाच्या कामातून जास्तीत जास्त उत्पन्न कसे वाढले. या साठी विद्यार्थ्यांनी विविध प्रयोग केले पाहिजेत. त्यासाठी आपण शेती आणि मातीशी नाळ जोडली पाहिजे असे आवाहन आदित्य कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कल्याण आपेट यांनी केले.**

## लातूर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**लातूर । प्रतिनिधी**

कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत १० मे, २०२५ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते २४ मे, २०२५ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील. शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील.

# श्री नारदस्वामी विद्यामंदिर येथे माजी विद्यार्थी मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न

### ● माजी विद्यार्थ्यांनी दिला जुन्या आठवणींना उजाळा !

**बीड । प्रतिनिधी**

लहानपणी नकोशी वाटणारी शाळा नंतर मात्र हवीहवीशी वाटते. याचा प्रत्यय रविवारी दि. ११ मे रोजी बीड शहरातील नवा मोंढा परिसरात असणाऱ्या श्री नारदस्वामी विद्यालयात झालेल्या माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्यात आला. जवळपास २३ वर्षांनंतर



एकत्र आलेल्या या शालेय मित्रांनी शाळेत असताना केलेल्या गमती-जमती, शिक्षकांनी केलेली शिक्षा, अशा अनेक आठवणींना उजाळा दिला. श्री नारदस्वामी विद्यालयाच्या या माजी विद्यार्थी मेळावा कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री बडेबाबा शिक्षण प्रसारक मंडळ लहुरी संस्थेचे संचालक श्री प्रसादजी संपतराव खांडेकर हे होते. तर व्यासपीठावर प्रमुख पाहुणे श्री चौरे सर, श्री. कागदे सर आणि श्री. शिरसट सर,श्री शेंडगे सर आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार नारायण महानोर यांनी मानले. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात कार्यरत असलेले श्री नारदस्वामी विद्यामंदिर या शाळेचे विद्यार्थी कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

# एम्समध्ये शिकणाऱ्या तरुणाने पुण्यात स्वत:ला संपवलं, वडीलही डॉक्टर

**बीड । प्रतिनिधी**

भोपाळच्या एम्स रुग्णालयात वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या बीड येथील एका तरुणाने पुण्यातील वानवडी परिसरात गळा चिरून स्वतः चं जीवन संपवलं आहे. उत्कर्ष महादेव हिंगणे असं या तरुणाचं नाव आहे. आत्महत्या करण्यापूर्वी त्याने व्हाट्सअपवर सुसाईड नोट लिहित आत्महत्येचं कारणही सांगितलं आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आज सकाळी १० वाजताच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. पुणे पोलीस नियंत्रण कक्षाला सकाळी यासंदर्भातील कॉल प्राप्त झाला. वानवडी येथील पंचरत्न हाऊसिंग सोसायटी येथे तरुणाचा मृतदेह असल्याची माहिती त्यांना देण्यात आली. त्यानंतर पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली असता त्यांना उत्कर्षचा मृतदेह गळा चिरलेल्या अवस्थेत बाथरूममध्ये आढळून आला. दरम्यान, पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली. त्यावेळी त्यांना उत्कर्षचा मोबाईल सापडला. त्याने व्हाट्सॲपवर सुसाईट नोट लिहिल्याचं आढळून आलं. या सुसाईट नोटमध्ये आपण अभ्यासाच्या तणावातून आत्महत्या करत असल्याचं त्याने सांगितलं. याबाबत बोलताना वानवडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सत्यजित आदमाने यांनी सांगितलं की, उत्कर्ष हा मुळचा बीड जिल्ह्यातील आहे. त्याने भोपाळ एम्समध्ये नुकताच वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश घेतला होता. एका कार्यक्रमासाठी तो पुण्यात आला होता. अभ्यासाच्या तणावातून त्याने आत्महत्या केल्याचे समोर आले आहे. याबाबतची सुसाईड नोटदेखीत आढळून आली आहे.

# टेनिस बॉल क्रिकेटच्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी बीड जिल्ह्यातील चार खेळाडूंची निवड

**बीड । प्रतिनिधी**

टेनिस बॉल क्रिकेट फेडरेशन ऑफ इंडिया व महाराष्ट्र टेनिस बॉल क्रिकेट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित.

टेनिस बॉल क्रिकेट टी १० राष्ट्रीय स्पर्धेमध्ये बीड जिल्ह्यातील चार खेळाडूंची महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. निवड झालेले खेळाडू सीनियर गट माऊली ढवळे, अतुल तांबे, गणेश शिंदे, जूनियर मध्ये आशिष मस्के या खेळाडूंची नागपूर येथे होणार्या टेनिस बॉल क्रिकेटच्या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व



करतील. या यशाबद्दल जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर,बीड जिल्हा टेनिस बॉल क्रिकेट असोसिएशनचे सचिव रामदास गिरी, एड. राजेंद्र बन, रोहित ढवळे, विशाल गिरी, महेश गव्हाणे, अमोल ढवळे, आणि प्रशिक्षक व पालकांनी खेळाडूचे कौतुक केले व पुढील स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# ‘कबड्डी’तून खेळाडूंचा सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**वर्धा । प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील तरुणाईला कबड्डी या खेळाची विशेष आवड आहे. अतिशय कमी गुंतवणुकीत हा खेळ खेळता येतो. या खेळामध्ये प्रचंड चपळाई, संयम, आक्रमकतेची आवश्यकता असते. या खेळाच्या माध्यमातून खेळाडूंचा सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास होत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज येथे केले.

कबड्डी असोसिएशन विदर्भ



संघ, नागपूर व ॲम्युचर कबड्डी फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने ९ ते १२ मे या कालावधीत देवाभाऊ राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. आज अंतिम सामना व बक्षिस समारंभ रामनगर येथील शहीद भगतसिंग मैदानावर आयोजित करण्यात आला. या स्पर्धेच्या समारोप सोहळ्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. यावेळी ते बोलत होते.

आदिवासी विकास मंत्री प्रा.डॉ.अशोक उईके, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, पालकमंत्री डॉ.पंकज भोयर, खासदार प्रफुल्ल पटेल, आमदार समीर कुणावार, आमदार सुमित वानखेडे, आमदार राजेश बकाने, माजी खासदार रामदास तडस, माजी आमदार सागर मेघे, सिने अभिनेते सुनील शेट्टी आदी यावेळी उपस्थित होते.

कबड्डी हा खेळ अतिशय प्राचीन आहे. महाभारतामध्ये या खेळाचा उल्लेख सापडतो. संत तुकारामांच्या अभंगात देखील कबड्डीचा उल्लेख आपल्याला आढळतो. देशाचा पारंपारिक खेळ म्हणून कबड्डीकडे पाहण्यात येते. कबड्डी या खेळाला देशी खेळामध्ये अत्यंत महत्त्व असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले.

दैनिक
● epaper.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
मंगळवार, दि.१३ मे २०२५
पान ४

## वारकरी शिक्षण संस्थेला उर्जित अवस्था स्वामी महाराजांनी आणली : उल्हास महाराज सूर्यवंशी

नेकनूर । प्रतिनिधी



आळंदी येथील जोग महाराज वारकरी शिक्षण संस्थेला उर्जित अवस्था बंकटस्वामी महाराजांनी आणली..भक्ती ज्ञान वैराग्य आणि साधना स्वामी महाराजांकडे होत्या साधनेचा आदर्श बंकट स्वामी महाराज यांनी घालून दिला. असे प्रतिपादन श्री ह भ प उल्हास महाराज सूर्यवंशी यांनी केले. संत बंकट स्वामी महाराज यांच्या पुण्यतिथी उत्सवात सहाव्या दिवसाचे कीर्तन पुष्पगुंपताना ते बोलत होते.. यावेळी प्रमुख उपस्थिती महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, श्री ह भ प ▶▶ उर्वरित पान २ वर

# गुंडगिरी करणाऱ्यांना बीड पोलिसांचा दणका!

**● चार गुंडांची एकाच दिवशी हर्सूल कारागृहात रवानगी**

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील गुंडगिरी, गुन्हेगारी आणि अवैध धंद्यांना आळा बसावा, यासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आणि पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी कठोर कारवाई केली आहे. त्याअंतर्गत बीड जिल्ह्यातील चार कुख्यात गुंडांना एकाच दिवशी हर्सूल कारागृहात पाठवण्यात आले.



या कारवाईमध्ये तारेख खान (रा. माजलगाव), विशाल डांबे (रा. वडवणी), गजानन जाधव (रा. अंबाजोगाई) आणि गणेश गिरी (रा. बीड) या गुंडांवर विविध गंभीर गुन्ह्यांमध्ये कारवाई करण्यात आली. तारेख खान याच्यावर जीव घेण्याचा प्रयत्न, मारहाण, चोरी व इतर गंभीर गुन्हे नोंद असून त्याला यापूर्वी तडीपार करण्यात आले होते. विशाल डांबे याच्यावर छेडछाड, जबरी चोरी व पोस्को अंतर्गत गुन्हे आहेत. गजानन जाधव याच्यावर हातभट्टी दारूची वाहतूक आणि विक्रीचे गुन्हे आहेत. तर गणेश गिरी याच्यावर खंडणी, जाळपोळ, जातीय भावना भडकवणे असे गंभीर गुन्हे नोंद आहेत.

या सर्व गुंडांवर त्यांनी आधी केलेल्या गुन्ह्याच्या आधारे प्रतिबंधात्मक कारवाया करण्यात आल्या असून, आता त्यांना हर्सूल कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. संबंधित पोलीस ठाण्यांनी ही कामगिरी पोलीस अधीक्षकांचे मार्गदर्शन घेत नियोजनपूर्वक केली.

पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी स्पष्ट केलं की, जिल्ह्यात गुन्हेगारी, खंडणी, अवैध दारू विक्री, वाळू तस्करी, काळाबाजार, तसेच जातीय तेढ निर्माण करणाऱ्या समाजकंटकांवर भविष्यातही मकोका आणि इतर कठोर कायद्यांतर्गत कारवाई केली जाणार आहे.

# खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीचा जामीन फेटाळला

**● ॲड. अक्षय मुळे यांनी मांडली पीडितेची बाजू**

बीड । प्रतिनिधी

बीड येथील सत्र न्यायालयाने एका गंभीर गुन्ह्यातील आरोपी राजू मुस्ताक पठाण याचा जामीन अर्ज फेटाळला आहे. आरोपीवर भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम १०९, ३३३, ११५(२) अंतर्गत गुन्हा क्रमांक ३८१/२०२४ दाखल आहे. पेठ पोलीस स्टेशन, बीड येथे या खटल्याची सुनावणी सुरू आहे.



फिर्यादीनुसार, १० डिसेंबर २०२४ रोजी रात्री ९ वाजता पीडिता घरी एकटी असताना आरोपी तिच्या घरात अनधिकृतपणे घुसला. त्यावेळी त्याने शर्ट घातलेला नव्हता. त्याने पीडितेचा उजवा हात मुरगळला आणि तिच्या चेहऱ्यावर मारले. तिला खाली पाडून तिच्या छातीवर बसून त्याने तिचा गळा दाबण्याचा प्रयत्न केला. पीडितेने आरडाओरड केल्याने तिची बहीण नितीन सखाराम चिंचकर यांनी धाव घेऊन तिला वाचवले. आरोपीने त्यांच्यावरही हल्ला करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर आलेल्या अक्षय शशिकांत शहाणे आणि जय पावले यांनी आरोपीला पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. दुसऱ्या दिवशी या घटनेची तक्रार दाखल करण्यात आली.

तपासात पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला आणि पीडितेचे कपडे जप्त केले. वैद्यकीय तपासणीत पीडितेच्या तोंडाच्या डाव्या व खालच्या बाजूला ओरखडे आढळले. साक्षीदारांचे जबाब नोंदवण्यात आले असून, आरोपीला अटक करून आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे. आरोपीच्या वकिलांनी युक्तिवाद केला की, आरोपी आणि पीडितेमध्ये कोणतेही पूर्वीचे वैर नव्हते आणि आरोपीने आपला जीव वाचवण्यासाठी घरात प्रवेश केला होता. पीडितेला झालेल्या जखमा साध्या स्वरूपाच्या आहेत, त्यामुळे जामीन मंजूर करावा.

याउलट, पीडितेची बाजू मांडताना ॲड. ए. व्ही. मुळे यांनी आरोपीच्या जामिनाला जोरदार विरोध केला. त्यांनी सांगितले की, आरोपीने पीडितेच्या जीवे मारण्याचा प्रयत्न केला होता आणि तो शर्ट न घालता घरात घुसला होता. ▶▶ उर्वरित पान २ वर



*बीड : स्व. शशिकला सुखदेवराव हिंगे यांच्या वर्ष श्रद्धा निमित्त अभिवादन करताना नवनाथ शिराळे, नवनाथ थोटे, शिवाजी खांडे ,अशोक हिंगे आदी.*

# मोठेवाडी ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी सुभद्रा खेत्री यांची निवड



माजलगांव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठेवाडी ग्राम पंचायतीच्या सरपंच पदी सुभद्रा अंगदराव खेत्री यांची सोमवारी बिनविरोध निवड करण्यात आली. मोठेवाडी ग्राम पंचायतीच्या सरपंच सत्यभामा मारोती दळवी ह्या अपात्र झाल्या मुळे त्यांच्या रिक्त झालेल्या सरपंच पदासाठी सोमवारी ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच पदासाठी निवडणूक घेण्यात आली.यावेळी सरपंच पदासाठी सुभद्रा खेत्री यांचा एकमेव उमेदवारी अर्ज आल्याने निवडणूक निर्णय अधिकारी तथा पंचायत समितीचे विस्तार अधिकारी पारडकर व ग्राम विकास अधिकारी बिभीषण डोरेले यांनी सुभद्रा खेत्री यांची बिनविरोध निवड जाहीर केली.यावेळी माजी सरपंच अविनाश गोंडे, मा. चेअरमण अशोक पास्टे, पत्रकार राजाभाऊ पास्टे, अंगदराव खेत्री, दत्तात्रय चव्हाण,

▶▶ उर्वरित पान २ वर

# बाळराजे दादा पवार जनसेवेत सक्रिय ; बाळराजे दादा जनतेत दाखल होताच नागरिकाची भेटण्यासाठी गर्दी

## पवार कुटुंबाची प्रमाणितपणा व निष्ठा बाळराजे दादा पवारांनी जनतेत सिद्ध केली

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई मतदार संघामध्ये पंडित विरोधी पवार सत्ता समिकरण वर्षानुवर्षे चाललेले आहे गेल्या दोन दशकांमध्ये पवार कुटुंबाला मोठ्या संघर्षातून जीवन जगावं लागलं तरी सुद्धा त्यांनी जनतेची सेवा सुरूच ठेवली असे स्व माधवराव बप्पासाहेब पवार यांचे कुटुंब पवार कुटुंबाचा करता धरता युवा तरुण बाळराजे माधवराव पवार तरुण वयातच एका गुन्हात जेलमध्ये सजा भोगतो आजोबा आमदार वडील आमदार



असताना कुठलाच बडे जाऊपना न करणारे प्रमाणिक सच्चे गेवराईचे पाटील म्हणून बाळराजे दादा पवार यांच्याकडे पाहीले जाते बाळराजे दादा पवार यांनी पाहिलेले स्वप्न साखार करण्यासाठी बंधू लक्ष्मण माधवराव पवार यांनी नगरपालिकेच्या मैदानात उतरुन बाजी पार केली बाळराजे दादा पवार यांच्या फोटो वर जनतेने कित्येक वर्षे नगरपालिकेचे सत्ता पवार कुटुंबाच्या ताब्यात दिली घरातला करता कुटुंबातला तरुण जेलमध्ये असताना कुठलाच चेहऱ्यावर दुःख न ठेवता गेवराईकरांची कुटुंब प्रमाणे या पवार कुटुंबाने सेवा केली याप्रमाणे पडीत राजकारणी घराण्याला २०१४ मध्ये हदरा देत बाळराजे दादा पवार यांच्या विश्वासावर बंधु लक्ष्मण आण्णा पवार यांना मोठ्या ▶▶ उर्वरित पान २ वर

## संगीतमय शिव महापुराण कथाचा लाभ घ्यावा चंद्रकांत सत्वधर



केज । प्रतिनिधी

माणसाला अध्यात्माची आवड भक्ती भाव निर्माण करण्यासाठी केज येथे दर वर्षी वेगवेगळे उपक्रमाचे आयोजन केले जाते. केज इथे दरवर्षी प्रमाणे या ही वर्षी संगीतमय शिव महापुराण कथा आयोजित केली असून प्रसिद्ध शिवकथाकार रूपाली ताई घोंगडे ▶▶ उर्वरित पान २ वर

# बंकटस्वामी संस्थानने आध्यात्मिक व्यासपीठावरून हाती घेतली रक्तदानाची चळवळ

## महिलांसह १२१ दात्यांनी केले रक्तदान



नेकनूर । प्रतिनिधी

श्रीक्षेत्र नेकनूर येथे संत बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवात भाविकांनी रक्तदानाचा विक्रम केला. तब्बल १२१ रक्तदात्यांनी रक्तदान करून एक अनोखा संदेश दिला आहे. वारकरी संप्रदायाचे भक्तीसूर्य गुरुनामगुरु श्री गुरु बंकटस्वामी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त श्रीक्षेत्र नेकनूर येथे भव्य अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहे. दररोज हजारो भाविक भक्त या उत्सवात ज्ञानदानासह चोवीस तास अन्नदानाचा लाभ घेत आहेत. या उत्सवात कन्यादान , वृक्षारोपण, आरोग्य शिबिर , आदी विधायक उपक्रम हाती घेऊन महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांनी रक्तदानाचे आवाहन केल्यानंतर स्वामी भक्तांनी रक्तदानासाठी पुढे येत तब्बल १२१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. सोमवार (दि. १२) सकाळी १० वाजता महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्या उपस्थितीत रक्तदान शिबिराचे उद्घाटन झाले. पाच वाजेपर्यंत चाललेल्या या शिबिरात उस्फूर्त प्रतिसाद पाहायला मिळाला. त्यामुळे जिल्हा आरोग्य यंत्रनेला मोठा हातभार लागला आहे. रक्ताचा तुटवडा असल्याने जिल्हा आरोग्य विभागाकडून रक्तदानाचे रक्तदात्यांना आवाहन केले जात आहे. यातच आध्यात्मिक व्यासपीठावरून रक्तदानाची चळवळ हाती घेत बंकटस्वामी संस्थाने एक वेगळा आदर्श घालून दिल्याच्या भावांना आरोग्य विभागाने व्यक्त केल्या.

अन्नदान द्रव्य दान भूमी दानापेक्षाही रक्तदान सर्वश्रेष्ठ आहे. रक्तदान हे जीवनदान देणारे आहे, त्यामुळे बंकटस्वामी महाराजांनी देखील विधायक आणि सकारात्मक दृष्टिकोनातून समाजप्रबोधनाची परंपरा चालवली होती त्याच परंपरेला पुढे नेत महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांनी समाज उपयोगी रक्तदानाचा उपक्रम घेत एक

▶▶ उर्वरित पान २ वर

# विश्वाला भगवान तथागत गौतम बुद्ध यांनी अहिंसा व शांतीचा संदेश दिला - नितीन धांडे

बीड । प्रतिनिधी

तथागत भगवान गौतम बुद्ध ढेकणमोह येथे आयोजित तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमास शिवसेना बीड जिल्हा संघटक नितीन धांडे यांनी उपस्थित राहून अभिवादन केले यावेळी सामाजिक कार्यकर्ते ज्येष्ठ नेते भाऊसाहेब काका डावकर,सरपंच शिवाजी गाडीवान,हनुमान देवकते, कैलास देवकते, रामा भोगे, भारत देवकते, भारत होंडरे, रामलिंग होंडरे, अनंत करांडे, सतीश देवकते, दादासाहेब थापडे, संतोष जाधव, शिवाजी



जाधव, दिलीप देवकते, काशिनाथ थापडे, सुरेश देवकते, अभिमान तावरे, यांची प्रमुख उपस्थिती होती

या कार्यक्रमाचे आयोजन बाबा शिंदे, प्रतिम शिंदे,विकास शिंदे, देवानंद शिंदे,अनिल शिंदे, अरुण शिंदे, दिलीप शिंदे, अमोल शिंदे, अमित शिंदे, सागर शिंदे, सुरज शिंदे, निखिल गायकवाड, शरद शिंदे, विनोद शिंदे, मधुकर शिंदे, गणेश शिंदे, बाबसाहेब डोंगरे, भागवत डोंगरे, बंडू गायकवाड, सचिन शिंदे, रामेश्वर शिंदे, कल्याण शिंदे, अक्षय शिंदे, ▶▶ उर्वरित पान २ वर

# घोसापुरीतील कामे पाहून सीईओ आदित्य जीवणे यांनी केले कौतूक



बीड । प्रतिनिधी

सरपंच हा गावातील प्रथम नागरिक असतो. सरपंचाने ठरवल्यास गाव कुठल्या कुठे जाते हे यापुर्वी पोपटराव पवार, भास्करराव पेरे आदींनी दाखवून दिलेले आहे. अशीच सर्वसामान्यांचे काम करण्याची तळमळ पाहून घोसापुरीच्या सरपंचपदी शेख फारुक यांची निवड करण्यात आली. काही वर्षातच शेख फारुक यांनी घोसापुरीचे रुपडे बदलले. रविवार, ११ रोजी जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी आदित्य जीवणे यांनी घोसापुरी गावाला भेट दिली. यावेळी गावातील झालेल्या व सुरु असलेल्या कामांची पाहणी केली. झालेल्या कामाचे कौतूकही केले. यावेळी प्रकल्प संचालक संगीतादेवी पाटील, ग्रामसेवक रविंद्र हावळे, उपसरपंच सुभाष जाधव यांची उपस्थिती होती. बीड शहरापासून जवळच

▶▶ उर्वरित पान २ वर

# तिन सहकारी मित्रांना एकाच वेळी लागली नोकरी

## चिंचवन येथील ओमकार मात्रे, आदिनाथ मात्रे, पवन कोठुळे यांची महापारेषणमध्ये भरती

वडवणी । प्रतिनिधी

तालुक्यातील चिंचवन येथील रहिवासी असलेले चिरंजीव ओमकार मात्रे, आदिनाथ मात्रे व पवन कोठुळे हनुमंत आंधळे या चार जणांचा गावकऱ्यांच्या मार्फत भव्य सत्कार करण्यात आला. हे तिन्ही बालमित्र यांच्या घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. पवनचे आई वडील दरवर्षी परभागामध्ये ऊस तोडणीचे काम करतात त्यामुळे त्याचं शिक्षण अत्यंत हलाखीच्या परिस्थितीमध्ये झालं. ओमकार यांचे आई वडील हे देखील ऊसतोड कामगार आहेत.



त्याच्याही वडिलांना केवळ दोन एकर जमीन आहे. त्यामुळे त्याच्या घरची परिस्थिती बेताचीच आहे. तर आदिनाथ याच्या घरची परिस्थिती देखील सर्वसामान्यच आहे. त्यांचेआई वडील देखील शेतामध्ये काम करूनच उदरनिर्वाह करतात या तिन्ही मुलांनी बालपणीपासून सोबतच गावातील मंकावती शाळेमध्ये घेतलं शिकत असताना गावातील वीज मंडळाचे कार्यालय त्यांना नेहमी दिसत असे. या कार्यालयामध्ये येणारे जाणारे कर्मचारी पाहून त्यांना असं वाटायचं की आपणही एक दिवस या साहेबांसारखे नोकरीला लागू. हे स्वप्न रंगवत त्यांनी शिक्षण पूर्ण केलं. शिक्षण घेऊन त्यांनी महापारेषण परीक्षा दिली. एकाच वेळी परीक्षेमध्ये पास झाले. या तिघांनाही एकाच दिवशी नियुक्ती मिळाली त्यामुळे या तिन्ही मित्रांचे स्वप्न साकार झालं. गावामध्ये त्यांच्या निवडीची माहिती मिळताच गावकऱ्यांनी फटाक्याच्या अतिश बाजी करून या तिन्ही तरुणांचं स्वागत केलं. गावातील सर्व नागरिकांनी एकत्र येत हनुमान मंदिराच्या भव्यदिव्य प्रांगणात या तिघांचाही नागरी सत्कार केला. गावातील सर्व नागरिक यावेळी उपस्थित होते. प्राचार्य सोनाथराव बडे, ▶▶ उर्वरित पान २ वर

